# मेट्रो-३ चे १७ किमीचे काम पूर्ण

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत (एमएमआरसी) कुलाबा-वांद्रे- सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या मार्गिकेचे भुयारीकरणाचे काम सुरू असून विविध टप्प्यांमधील एकूण १७ किलोमीटरपर्यंत काम पूर्ण झाले आहे. मार्गिकेच्या पाचव्या पॅकेजमध्ये गोदावरी या टनेल मशीनमार्फत सुमारे तीन किलोमीटरपर्यंतचे काम पूर्ण झाले असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत सांगण्यात आले.